# आत्मनिर्भर भारत
# भाग 5- सरकारी सुधारणा आणि सक्षमता
# 17.05.2020

सत्यमेव जयते
Government Of India






# कोविड अनुषंगाने आरोग्याशी संबंधित उचललेली पावले

- यापूर्वीच रुपये 15,000 कोटींची मदत घोषणा
- राज्यांना दिलेली मदत- रुपये 4113 कोटी
- आवश्यक वस्तू- रुपये 3750 कोटी
- तपासणी केंद्रे व साहित्य- रुपये 550 कोटी
- प्रधानमंत्री गरिब कल्याण योजनेअंतर्गत आरोग्य व्यवसायिकांसाठी प्रत्येकी रुपये 50 लाखाचा विमा

माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग-
- ई-संजीवनी द्वारा संपर्क सेवा
- क्षमता बांधणी: आभासी शिक्षण साधन पर्याय- iGOT मंच
- आरोग्यसेतू- स्वपरिक्षण व संपर्काचा माग
- आरोग्य कर्मचाऱ्यांना संरक्षण-
- महामारी कायदा सुधारणा
- पीपीईसाठी पुरेशी तरतूद-

  * शून्य ते 300 स्थानिक निर्माते
  * केलेला पुरवठा- पीपीई (51 लाख), एन 95 मास्क (87 लाख), एचसीक्यू गोळ्या (11.08 कोटी)



# शासकीय सुधारणांच्या माध्यमातून उद्योग सुलभीकरण




- जागतिक पातळीवर संभाव्य गुंतवणूकदार देशाचा उद्योग सुलभीकरण अहवाल (DBR) पाहतात.
- शाश्वत उपायांमुळे जागतिक बँकेच्या उद्योग सुलभीकरण अहवालात भारत 2014 मध्ये 142 व्या स्थानी होता, तो 2019 मध्ये 63 व्या स्थानावर पोहचला.
- परवाने पद्धती, स्व-प्रमाणीकरण आणि इतर उपायांमध्ये थर्ड पार्टी प्रमाणपत्र यात सुलभीकरण
- सरकार उद्योग सुलभीकरणाच्या पुढच्या टप्प्यासाठी मिशन मोडवर काम करत आहे, यात संपत्तीची नोंदणीप्रक्रीया, व्यावसायिक तंट्यांचे तात्काळ निवारण आणि देशाला व्यापार सुलभ बनवण्यासाठी सोप्या करप्रणालीवर काम सुरु आहे.

# उद्योगस्नेही वातावरणनिर्मितीला चालना देण्यासाठी कॉर्पोरेट कायद्याअंतर्गत करण्यात आलेल्या उपाययोजना

- कंपनी कायद्यातील गुन्हेगारी तरतुदी काढण्याच्या पहिल्या टप्प्यांत 2018 साली, जागेवर निकाली लागू शकणाऱ्या 16 गुन्ह्यांना कंपनीच्या स्वतःच्या न्यायक्षेत्रात आणि दंड आकारणी यंत्रणेखाली आणले गेले.

- एकात्मिक वेब-आधारित इन्कॉर्पोरेशन फॉर्म – कंपनीची ऑनलाईन नोंदणी करण्यासाठी एक सुलभ प्रक्रिया (SPICe) फॉर्म आणला गेला. या फॉर्म मध्ये विविध 10 मंत्रालयांच्या आणि एका राज्य सरकारच्या सेवा एकाच फॉर्मवरुन उपलब्ध केल्या गेल्या.

- स्वतंत्र संचालकांची डेटाबॅंक सुरु करण्यात आली.

- कंपनी कायदा, 2013 अंतर्गत असलेल्या 14,000 शिक्षांची तरतूद रद्द करण्यात आली.



# उद्योग सुलभीकरणासाठी नव्या कॉर्पोरेट कायदा उपाययोजना

- संबंधित पक्षाच्या व्यवहाराशी संबंधित तरतुदींचे तर्कसंगतीकरण
- कंपनी कायदा 2013 मधील विविध तरतुदींनुसार अनुपालन ओझे कमी करण्यासाठी कोविड -19 दरम्यान वेळेवर कारवाई तसेच कंपन्यांना संचालक मंडळाची बैठक, विशेष सर्वसाधारण सभा, वार्षिक बैठक,  हक्कविषयक दाव्यांचे निराकरण डिजिटल माध्यमातून करण्यास सक्षम करतात.
- 2016 पासून नादारी आणि दिवाळखोरी कायदा (आयबीसी) लागू झाल्यापासून 221 निराकरण झालेल्या प्रकरणांमध्ये 44% पुनर्प्राप्ती झाली आहे
- 4.13 लाख कोटी रुपयांचे दावे मान्य केले गेले.
- प्राप्तीयोग्य रक्कम आहे 1.84 लाख कोटी रुपये
- आयबीसीच्या तरतुदीनुसार प्रवेशापूर्वी 29 फेब्रुवारी 2020 पर्यंत आयबीसी अंतर्गत 13566 प्रकरणांमध्ये एकूण 5.01 लाख कोटी रुपये (अंदाजे) काढले गेले आहेत.



## तंत्रज्ञान संचालित प्रणाली- कोविड दरम्यान ऑनलाईन शिक्षण

- इंटरनेट सुविधा नसलेल्यांसाठी 'स्वयंप्रभा' ही डीटीएच वाहिनी. शालेय शिक्षणासाठी सुरु असलेल्या 3 वाहिन्यांसोबत आता आणखी 12 वाहिन्या समाविष्ट करणार.
- या वाहिन्यांवर स्काईप मार्फत तज्ज्ञांशी  घरातूनच थेट संवाद सत्र प्रक्षेपण तरतूद
- या वाहिन्यांवरील शैक्षणिक कार्यक्रम अधिक लोकांपर्यंत पोहचण्यासाठी टाटा स्काय व एअरटेल या खाजगी डीटीएच ऑपरेटर्सशी करार
- स्वयंप्रभा' वाहिन्यांच्या दररोज 4 तास प्रक्षेपणाकरीता राज्यांसोबत समन्वयन
- 24 मार्च पासून आजपर्यंत दिक्षा मंचाला 61 कोटी लोकांची भेट
- ई-पाठशाळेमध्ये 200 नवीन पुस्तके समाविष्ट





# सरकारी सुधारणा आणि सक्षमता

Goverment Of India



# रोजगारनिर्मितीला चालना देण्यासाठी मनरेगात रु. 40,000 कोटींची वाढ

- सरकार आता मनरेगासाठी अतिरिक्त 40,000 कोटी रु. देणार
- यामुळे एकूण 300 करोड मनुष्यदिन रोजगारनिर्मिती होण्यास मदत होईल
- परतणाऱ्या स्थलांतरीत मजुरांसाठी पावसाळ्यातही काम उपलब्ध करुन दिले जाणार
- जल संवर्धनासह शाश्वत आणि उपजिविकेची साधने निर्माण करणार
- उच्च उत्पादनाद्वारे ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना



# आरोग्यविषयक सुधारणा आणि उपक्रम

**सार्वजनिक आरोग्यक्षेत्रात गुंतवणूक वाढ** –

- आरोग्यक्षेत्रावरील सार्वजनिक खर्चात वाढ केली जाईल.
- तळागाळातील आरोग्य संस्थांमध्ये गुंतवणूक वाढवली जाईल.
- ग्रामीण आणि नागरी क्षेत्रातील आरोग्यकेंद्रांचा विस्तार


**भविष्यातील जागतिक साथीच्या आजारांसाठी भारताला सज्ज करणे**

- सर्व जिल्ह्यात-संसर्गजन्य आजारांच्या रुग्णालय ब्लॉक
- प्रयोगशाळा आणि निरीक्षक केंद्र व्यवस्था अधिक सक्षम करणे –
- देशातील सर्व जिल्ह्यात एकात्मिक सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा आणि गट पातळीवरील प्रयोगशाळा तसेच संसर्गजन्य आजारांवर उपचार/नियंत्रणासाठी सार्वजनिक आरोग्य विभाग
- संशोधनाला प्रोत्साहन – आयसीएमआर च्या वतीने 'सर्वांसाठी आरोग्य'अंतर्गत राष्ट्रीय संस्थात्मक मंच
- राष्ट्रीय डिजिटल आरोग्य अभियान: -- राष्ट्रीय डिजिटल आरोग्य ब्लू प्रिंट ची अंमलबजावणी



# कोविड नंतर तंत्रज्ञानाधारित समान शिक्षण

- पंतप्रधान इ विद्या- विविध डिजिटल/ऑनलाईन शिक्षणासाठी तात्काळ सुरु होणार कार्यक्रम. यात खालील गोष्टींचा अंतर्भाव आहे.
- शालेय शिक्षणासाठी राज्य आणि केंद्रशासित प्रदेशात इ आधारित आणि क्यू आर कोड द्वारे दीक्षा कार्यक्रम
- पहिली ते बारावी च्या प्रत्येक वर्गासाठी एक विशिष्ट दूरदर्शन वाहिनी ( एका वर्गाला एक वाहिनी)
- रेडिओ, समुदाय रेडिओ आणि पॉडकास्टचा विस्तारित वापर
- दृष्टिबाधित आणि कर्णबधिर मुलांसाठी विशेष इ सामग्री
- 30 मे 2020 पर्यंत पहिल्या 100 क्रमांकाच्या विद्यापीठांमध्ये स्वयंचलित ऑनलाईन अभ्यासक्रम घेण्यास परवानगी
- **मनोदर्पण**- विद्यार्थी, शिक्षक आणि कुटुंबियांच्या मानसिक आरोग्यासाठी आणि भावनिक आधारासाठी मानसोपचाराद्वारे सहकार्य करण्याचा उपक्रम तात्काळ सुरु करणार
- शाळा, शिशूवर्ग आणि शिक्षकांसाठी जागतिक स्तरावरील आणि 21 व्या शतकातील कौशल्य आवश्यकतांसह नवीन राष्ट्रीय अभ्यासक्रमआणि अध्यापनशास्त्रीय सहकार्य करण्याचा कार्यक्रम सुरु करणार.
- सन 2025 पर्यंत प्रत्येक मुलाला पाच ग्रेड पर्यंत शैक्षणिक पातळीवर नेण्यासाठी राष्ट्रीय साक्षरता अभ्यासक्रम आणि न्युमरसी अभियान डिसेंबर 2020 पर्यंत सुरु करणार



# आयबीसी संबंधित उपाययोजनांद्वारे व्यापार सुलभीकरणात पुढिल भर

सत्यमेव जयते
Goverment Of India

- दिवाळखोरीची मर्यादा रक्कम एक लाख रुपये ऐवजी वाढवून रुपये एक कोटी केली (जी सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसाठी साह्यभूत ठरेल)
- कलम 240 अ अंतर्गत सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसाठी विशेष दिवाळखोरी उपाय रचना लवकरच
- महामारी परिस्थितीचा अंदाज घेऊन ताजी दिवाळखोरी कार्यवाही एक वर्षापर्यंत मागे घेणार
- दिवाळखोरी संबधित 'थकीत कर्ज 'च्या व्याख्येतून कोविड संबधित कर्जे वगळण्याचा केंद्र सरकारला अधिकार.

# कॉर्पोरेट क्षेत्रांसाठी उद्योगस्नेही वातावरण निर्मिती

Government Of India

- कंपनी कायदा वैधीकरण, छोट्या तांत्रिक बाबी आणि प्रक्रियात्मक चुकीसाठी (जसे सीएसआर अहवालात त्रुटी, अपूर्ण मंडळ अहवाल, दिवाळखोरीची नोंद, वार्षिक सर्वसाधारण बैठकीस दिरंगाई).
- बहुतांश माफ करण्याजोगे गुन्हे अंतर्गत न्यायनिवाडा यंत्रणेकडे (IAM) हस्तांतरीत आणि RD च्या अधिकारांमध्ये वाढ (पूर्वी IAM कडे 18 कलम होते, ते आता 58)
- या सुधारणांमुळे फौजदारी गुन्हे आणि राष्ट्रीय कंपनी कायदा लवादाचे विभक्तीकरण
- एकत्रित 7 गुन्हे वगळण्यात आले आणि 5 इतर पर्यायी आराखड्याद्वारे नियमित केले जाणार

# कॉर्पोरेट क्षेत्रांसाठी उद्योगस्नेही वातावरण निर्मिती

‘उद्योग सुरु करण्याविषयीच्या’ मानांकनात सुधारणा आणि ‘नादारीचे निराकरण’ या दोन उपाययोजनांमुळे भारताच्या उद्योगस्नेही वातावरण निर्मिती म्हणजेच EoDB क्रमवारीत सुधारणा होण्यास मदत झाली.

पुढच्या महत्वाच्या सुधारणांमध्ये--

- परवानगी असलेल्या परदेशी कार्यक्षेत्रात भारतीय सार्वजनिक कंपन्यांकडून सिक्युरिटीज थेट सूचीबद्ध करणे
- ज्या खाजगी कंपन्या शेअरबाजारात NCDs सूची करतात, त्या सूचीबद्ध कंपन्या म्हणून मानल्या जाणार नाहीत.
- कंपनी कायदा, 2013 मध्ये, कंपनी कायदा 1956 मधील भाग IXA च्या तरतुदी (उत्पादक कंपन्या) समाविष्ट करणे.
- NCLAT च्या पीठांसाठी अतिरिक्त/विशेष अधिकार निर्मिती
- छोट्या कंपन्या, एका-व्यक्तीच्या कंपन्या, उत्पादक कंपन्या आणि स्टार्ट अप्स यांच्या सर्व प्रकारच्या कर्जबुडवेगिरीबद्दल कमी शिक्षेची तरतूद



# नवीन आणि स्वावलंबी भारतासाठी सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग धोरण

सत्यमेव जयते
Goverment Of India

- गेल्या काही दशकांमध्ये भारत आणि जग खूप बदलले आहे.
- नवीन सुसंगत धोरणाची गरज - जिथे सर्व क्षेत्रे खासगी क्षेत्रासाठी खुले असतील तर सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग परिभाषित क्षेत्रात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतील.
- त्यानुसार सरकार नवीन धोरण जाहीर करेल ज्यात
- सार्वजनिक हितासाठी सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांची उपस्थिती आवश्यक असलेल्या धोरणात्मक क्षेत्रांची यादी अधिसूचित केली जाईल
- धोरणात्मक क्षेत्रात कमीत कमी एक उद्योग सार्वजनिक क्षेत्रातील असेल मात्र खासगी क्षेत्रालाही मान्यता दिली जाईल.
- इतर क्षेत्रात सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचे खासगीकरण केले जाईल. (व्यवहार्यता इत्यादींवर आधारित वेळ ठरवली जाईल)

# राज्य सरकारांना संपूर्ण पाठिंबा

सत्यमेव जयते
Goverment Of India

- राज्यांप्रमाणेच केंद्रालाही तीव्र महसूल तुटीला समोरे जावे लागत आहे
- तरीदेखील या कठीण प्रसंगी केंद्र राज्यांना संपूर्ण पाठिंबा देत आहे
- अर्थसंकल्पातील अंदाजात महसूल कमी दाखवत असताना देखील एप्रिल मध्ये रुपये 46,038 कोटीचे कर विचलन करण्यात आले
- केंद्रात आर्थिक स्त्रोत तणाव असूनदेखील राज्यांना एप्रिल व मे महिन्यात रुपये 12,390 कोटीचे महसूल तूट अनुदान वेळेत देण्यात आले आहे
- 'एसडीआरएफ'चा रुपये 11,092 कोटीचा निधी एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यात आगाऊ देण्यात आला
- कोविड विरोधी उपक्रमांसाठी आरोग्य मंत्रालयाने रुपये 4,113 कोटीहून अधिक निधी दिला
- केंद्राच्या विनंतीवरून आरबीआय ने पुढिल गोष्टी केल्या-
- वेज अँड मिन्स' ची राज्यांची मर्यादा 60% वाढविली
- राज्ये आता ओव्हरड्राफ्ट सलग 14 ऐवजी 21 दिवस काढू शकतात
- तिमाही मध्ये 32 ऐवजी 50 दिवस राज्ये ओव्हरड्राफ्ट काढू शकतात.

# राज्य सरकारांना मदत

- राज्यांसाठी 2020-21 साठी निव्वळ कर्जमर्यादा 6.41 लाख कोटी आहे, ती राज्यांच्या जीडीपीच्या 3% आहे
- 75% रक्कम राज्यांना मार्च 2020 मध्येच प्रमाणित करण्यात आली आहे आणि बाकीची राज्यांवर सोपवली आहे
- राज्यांनी निर्धारीत मर्यादेच्या फक्त 14 % कर्ज आतापर्यंत घेतले आहे. 86% प्रमाणित रक्कम वापराविना आहे
- तरीसुद्धा राज्यांकडून कर्जमर्यादा 3% वरुन 5% विशेष वाढ करण्याची मागणी आहे
- आकस्मिक संकटाची परिस्थिती पाहता, केंद्र सरकारने फक्त 20 20-21 साठी विनंती मान्य करुन कर्जमर्यादा 3% वरुन 5% करण्याचा निर्णय घेतला आहे.
- यामुळे राज्यांना अतिरिक्त कोटी 4.28 लाख कोटी रुपयांचा स्रोत प्राप्त होईल

# राज्य सरकारांना सहाय्य आणि राज्य पातळीवरील सुधारणांना प्रोत्साहन

सत्यमेव जयते
Goverment Of India

**कर्जापैकी काही भाग विशिष्ट सुधारणांशी जोडला जाईल.(यात वित्त आयोगाकडून आलेल्या शिफारशींचाही समावेश असेल) :--**

- भविष्यकाळातील उच्च GSDP वृद्धी आणि  कमी वित्तीय तूट या मार्गाने, अतिरिक्त कर्जाची शाश्वतता सुनिश्चित करणे.
- स्थलांतरित मजुरांच्या कल्याणाला प्रोत्साहन आणि अन्नवाटपातील गळती कमी करणे,
- गुंतवणुकीच्या माध्यमातून रोजगारनिर्मिती
- ऊर्जाक्षेत्र शाश्वत करत असतांनाच शेतकऱ्यांच्या हितांचे रक्षण करणे, आणि
- नागरी विकास, आरोग्य आणि स्वच्छतेला प्रोत्साहन.
- **या सुधारणा चार क्षेत्रात संलग्न केल्या जातील:- "एक देश, एक शिधापत्रिका' योजनेचे सार्वत्रिकीकरण, उद्योगस्नेही वातावरण, ऊर्जा पारेषण आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा महसूल.**
- व्यय विभागाकडून, खालील पद्धतीने एक विशिष्ट योजना अधिसूचित केली जाईल:
  - **0.50 % विनाअट वाढ**
  - **चार शाखांमधल्या 0.25%  म्हणजे 1 %, म्हणजे प्रत्येक क्षेत्रात स्पष्टपणे वर्णित, मोजता येण्यासारख्या आणि शक्य अशा सुधारणा.**
  - **जर चार पैकी किमान तीन क्षेत्रात इच्छित लक्ष्य गाठण्यात यश आले तर आणखी 0.50 % वाढ**

# आधीच्या उपाययोजनांमधून प्रोत्साहन

| क्र. | उपाययोजना | रुपये कोटीमध्ये |
|---|---|---|
| 1 | 22 मार्च 2020 पासून कर सवलतींमुळे गमावलेला महसूल | 7,800 |
| 2 | प्रधानमंत्री गरिब कल्याण योजना (PMGKP) | 1,70,000 |
| 3 | आरोग्य क्षेत्रासाठी पंतप्रधानांची घोषणा | 15,000 |
| | एकूण | 1,92,800 |

सत्यमेव जयते
Goverment Of India

# गाभ1 .नहासतोप्र रोवदं्ाणषोघ लीधम

| क्रमांक | प्रकार | रुपये कोटीत |
|---|---|---|
| 1 | एमएसएमईसह व्यवसायांसाठी आपत्कालीन डब्ल्यू / सी सुविधा | 3,00,000 |
| 2 | तणावग्रस्त एमएसएमईसाठी दुय्यम कर्ज | 20,000 |
| 3 | एमएसएमईसाठी फंड ऑफ फंड्स | 50,000 |
| 4 | व्यवसाय आणि कामगारांना कर्मचारी भविष्य निर्वाह निधीचे समर्थन | 2,800 |
| 5 | कर्मचारी भविष्य निर्वाह निधी दरात कपात | 6,750 |
| 6 | एनबीएफसी / एचएफसी/ एमएफआयसीसाठी विशेष तरलता योजना | 30,000 |
| 7 | एनबीएफसी / एमएफआयसाठीच्या उत्तरदायित्वासाठी आंशिक पत हमी योजना | 45,000 |
| 8 | वीज वितरण कंपन्यां- डिसकॉमसाठी तरलता | 90,000 |
| 9 | टीडीएस / टीसीएस दरात कपात | 50,000 |
| | एकूण | 5,94,550 |

# भाग 2 मधील घोषणांद्वारे प्रोत्साहन दिले गेले

सत्यमेव जयते
Goverment Of India

| क्र. | विषय | रुपये कोटीमध्ये |
|---|---|---|
| 1 | स्थलांतरीत कामगारांना दोन महिन्यांसाठी मोफत अन्नधान्य पुरवठा | 3,500 |
| 2 | मुद्रा शिशु कर्जाकरिता व्याजदरात सवलत | 1,500 |
| 3 | रस्त्यावरील विक्रेत्यांना विशेष पत सुविधा | 5,000 |
| 4 | मध्यम उत्पन्न गट गृहबांधणी योजना | 70,000 |
| 5 | नाबार्ड मार्फत अतिरिक्त तत्काळ खेळते भांडवल | 30,000 |
| 6 | केसीसी मार्फत अतिरिक्त पत पुरवठा | 2,00,000 |
| | एकूण | 3,10,000 |

सत्यमेव जयते
Goverment Of India

# तिसऱ्या भागात जाहीर केलेली आर्थिक मदत

| अ.क्र. | विभाग | रु. (कोटी) |
|---|---|---|
| 1 | अन्न सूक्ष्म उपक्रम | 10,000 |
| 2 | प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजना | 20,000 |
| 3 | निधीअंतर्गत निधी- हरीत मोहीम | 500 |
| 4 | कृषी पायाभूत कोष | 1,00,000 |
| 5 | पशु संवर्धन पायाभूत विकास कोष | 15,000 |
| 6 | औषधी वनस्पती लागवड प्रोत्साहन | 4,000 |
| 7 | मधमाशी पालन उपक्रम | 500 |
| | एकूण | 1,50,000 |

सत्यमेव जयते
Goverment Of India

# चौथ्या आणि पाचव्या भागात जाहीर केलेली आर्थिक मदत

| अ.क्र. | विभाग | (रु.कोटी) |
|---|---|---|
| 1 | व्यवहार्यता तफावत निधी | 8,100 |
| 2 | अतिरिक्त मनरेगा तरतूद | 40,000 |
| | एकूण | 48,100 |

# आत्मनिर्भर भारत पैकेज अंतर्गत देण्यात आलेला समग्र प्रोत्साहनपर निधी

सत्यमेव जयते
Goverment Of India

| अनु | प्रकार | | रुपये (कोटी) |
|---|---|---|---|
| 1 | भाग 1 | | 5, 94,550 |
| 2 | भाग 2 | | 3,10,000 |
| 3 | भाग 3 | | 1,50,000 |
| 4 | भाग 4 आणि 5 | | 48,000 |
| | एकूण (उप ) | | 11, 02,650 |
| 5 | आधीच्या उपाययोजना | | 1,92, 800 |
| 6 | RBI उपाययोजना (प्रत्यक्ष) | | 8,01, 603 |
| **एकूण (उप )** | | | 9,94,403 |
| **एकूण रक्कम** | | | 20,97,053 |

सत्यमेव जयते
Goverment Of India

# धन्यवाद